श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक व बहुउद्देशिय संस्था, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर संचलित हनुमान विद्यालय, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर शाळेचे माणदेश एज्युकेशन सोसायटी, अजनाळे, ता.सांगोला, जि.सोलापूर या संस्थेस हस्तांतर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशाह ३११९/प्र.क्र.३५०/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : १) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचे क्र.जिपसो/शिक्षण/माध्य/३०२२/ २०१५, दिनांक ३/१०/२०१५ चे पत्र.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे क्र.शिउसं/माध्य-३/१२/हस्तांतरण/पुवि/२०१५/ २१५७५/७७, दिनांक २९/१०/२०१५ चे पत्र.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे क्र.शिउसं/माध्य-३०१/पुवि/शाळा हस्तांतर/हनुमान विद्यालय/२०१९/२१४४, दिनांक १२/०३/२०१९ चे पत्र.
४) सहायक निबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्र.C११०६८८२/१९, दि.५/०४/२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :

श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक व बहुउद्देशिय संस्था, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर संचलित हनुमान विद्यालय, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर शाळेच्या हस्तांतराचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या दिनांक ३/१०/२०१५ च्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांना पाठविण्यात आला होता. त्यास विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी दिनांक २९/१०/२०१५ रोजी अधिकारकक्षेच्या बाहेर जाऊन मान्यता प्रदान केली होती. तद्नंतर सदरच्या हस्तांतराबाबत श्री.विलास रामचंद्र पाटील यांनी मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचेकडे दिनांक २२/०६/२०१८ रोजी तक्रार केली होती. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ९५९९/२०१८ दाखल केली होती.

२. सदरील रिट याचिका क्रमांक ९५९९/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९/०१/२०१९ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी दिनांक ४/०२/२०१९ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १२/०३/२०१९ च्या पत्रान्वये शासनास हस्तांतर प्रस्ताव सादर केला आहे. मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २९/०१/२०१९ चे आदेशात सुधारणा करून हस्तांतराबाबतची सुनावणी सचिव, शालेय शिक्षण यांचेकडे घेण्यात यावी असे निदेश दिल्याचे सहायक निबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ५/०४/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यास अनुसरून या प्रकरणी अपर मुख्य सचिव

(शालेय शिक्षण) यांचेकडे दिनांक ४/०६/२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर शाळा हस्तांतर प्रकरण निर्णयासाठी मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्याकडे सादर करण्याचा निर्णय सुनावणीत घेण्यात आला.

३. उपरोक्त सुनावणीतील निर्णयाच्या अनुषंगाने श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक व बहुउद्देशिय संस्था, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर संचलित हनुमान विद्यालय, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक शाळेचे, माणदेश एज्युकेशन सोसायटी, अजनाळे, ता.सांगोला, जि.सोलापूर संस्थेस हस्तांतराबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

प्रकरणातील वस्तुस्थिती व विद्यार्थी हित लक्षात घेऊन, सदर शाळेचे, माणदेश एज्युकेशन सोसायटी, अजनाळे, ता.सांगोला, जि.सोलापूर या संस्थेकडे हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

(१) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर हस्तांतरणानंतरही कार्यरत राहील.

(२) शासन निर्णय, दिनांक २८/०८/२०१५ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांनुसार तसेच, शाळांबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत, हे संस्थेवर बंधनकारक राहील तसेच, अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे अनिवार्य राहील.

(३) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

(४) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.

(५) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक: माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार अंमलात येईल.

(६) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे नव्याने कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदला संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सर्व बाबी तपासून व वरील अटी/शर्तीं व्यतिरिक्त आवश्यक अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१७१३२३२०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.08.30 17:24:43 +05'30'

(प्रविण मुंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

४) अध्यक्ष/ सचिव, श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक व बहुउद्देशिय संस्था, सुपली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

५) अध्यक्ष/ सचिव, माणदेश एज्युकेशन सोसायटी, अजनाळे, ता.सांगोला, जि.सोलापूर

६) निवडनस्ती (एसएम-१).